मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी यु.एल.पी. तक्रार क्र.१९७/२०१४ मध्ये दि.०१/०८/२०१५ रोजी दिलेल्या न्यायालयीन निर्णयानुसार दुग्धव्यवसाय विकास विभागामध्ये मजूरांची ५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग
शासन निर्णय क्र. दुविआ-१४१४/प्र.क्र.१९६/पदुम-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक- ११.०४.२०१८

वाचा :- १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.दुविआ १११३/प्र.क्र.२४२/पदुम ९, दि.०६/०८/२०१४.
२) आयुक्त, दु. वि.यांचे पत्र क्र.आदुवि -११/आरे युएलपी क्र.१९७/२०१४/२०१८/१०१०, दि.१/३/२०१८
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१४/प्र.क्र.५०/१४/विसु-१, दि.२८/०७/२०१४.
४) विधी व न्याय विभाग अनौ संदर्भ. क्र.१९-२०१६/E, दि.११/०३/२०१६.
५) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक.क्र. SRU-२००१/प्र.क्र. २७/२००१/१२ दि.२०/१०/२००५

प्रस्तावना:

मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांच्या आस्थापनेवरील २२ रोजंदारी कामगारांनी त्यांना सेवेतून कमी केल्याबद्दल शासकीय दूध कामगार संघटनेमार्फत मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे यु.एल.पी.तक्रार क्र.२३४/२००२ दाखल केली होती. प्रस्तूत प्रकरणी मा.औद्योगिक न्यायालयाने दि.२६/०९/२००६ च्या निर्णयान्वये तक्रारदार कामगारांना तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून कायम कर्मचाऱ्यांना देय असलेले फायदे देण्याबाबत आदेशित केले आहे. सदर निर्णयाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र.४६१३/२००८ दि.२८/१०/२०१० रोजी फेटाळल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्र.११०४६/२०१२ दाखल केली होती. सदर याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे यु.एल.पी. तक्रार क्र.२३४/२००२ मध्ये मा.औद्योगिक न्यायालयाने दि.२६/०९/२००६ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक झाले. तथापी औद्योगिक न्यायालयामध्ये साक्षीपुरावा नोंदणीच्या वेळी शासकीय दूध कामगार संघटनेच्या वकीलांनी २२ कामगारांपैकी ६ कामगारांची नांवे वगळल्यामुळे सदर तक्रारीमध्ये १६ कामगार होते. सदर १६ तक्रारदार कामगारांना तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून म्हणजे दि.३१/०१/२००२ पासून मजदूर पदावर नियुक्ती देण्याच्या दृष्टीने व सदर पदाचे आर्थिक लाभ देण्याच्या दृष्टीने १६ मजूरांची अधिसंख्य पदे निर्माण करण्यास दि.०६/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

तदनंतर उर्वरित ६ कामगारांनी मा.औद्योगिक न्यायालय,मुंबई येथे याचिका क्र.१९७/२०१४ दाखल केली होती. सहा कामगारांपैकी श्रीमती पेरिअम्मा कलियान यांचे दि.१३/०८/२०१४ रोजी निधन झालेले असल्याने त्यांचे नांव वगळून उर्वरित पाच कामगारांना दि.३१/०१/२००२ पासून २३४/२००२ मधील निर्णयाप्रमाणे नियमित करुन अनुषंगीक लाभ अदा करण्याबाबत मा.औद्योगिक न्यायालयाने दि.०१/०८/२०१५ रोजीच्या निर्णयान्वये आदेशित केलेले आहे. या आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल करणे संयुक्तीक नसल्याचे विधी व न्याय विभागाने अभिप्राय दि.११/३/२०१६ च्या संदर्भान्वये दिलेले आहेत. या अभिप्रायास अनुसरुन न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२०/१०/२००५ च्या परिपत्रकामधील सुचनांप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाची नेहमीच्या पध्दतीने ५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.१९७/२०१४ वरील दि.०१/०८/२०१५ च्या आदेशानुसार तक्रारदार १) श्रीमती ज्योती पेरीस्वामी, २) श्रीमती मुनीअम्मा मारी, ३) श्री.मदुराई माणिकम, ४) श्रीमती नवनिता तनपाल, व ५) श्री.आरमुगम कामराज या ५ रोजंदार कामगारांना तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.३१/०१/२००२ पासून मजदूर पदाचे आर्थिक लाभ देण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागामध्ये ५ मजूरांची अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

सदर कर्मचाऱ्यांना दुग्धव्यवसाय विकास विभागातील वेळोवेळी रिक्त होणाऱ्या पदांवर सामावून घेण्यात यावे व त्याप्रमाणे उपरोक्त निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे निरसित करण्यात यावीत.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१५४/१८/व्यय-२, दि.०९/०३/२०१८ आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.११६२/ का.१२, दि.०७/१०/२०१७ अन्वये प्राप्त सहमती नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणक संकेतांक २०१८०४१६१३२०२२०६०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Naikwade Ashok Shivaji

Digitally signed by Naikwade Ashok Shivaji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ee35d3eddb6baa653600ca8a102ebe878e80bcc3e4aa8982862484ade13ccc4b, serialNumber=289064309a4417dcf339786241d3052e5ddbd6f07628be5505318b15872cbcdc, cn=Naikwade Ashok Shivaji
Date: 2018.04.16 13:23:35 +05'30'

(अशोक नाईकवाडे)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण), मुंबई/नागपूर.

२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य. मंत्रालय, मुंबई-३२.

३) प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

५) सचिव (पदुम) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

६) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८

७) उप आयुक्त (प्रशासन), दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८.

८) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-१८.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे, आरे दुग्धवसाहत, गोरेगाव(पूर्व), मुंबई-६५.

१०) मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.

११) वित्त विभाग, कार्यासन व्यय-२/वित्तीय सुधारणा-१/ मंत्रालय, मुंबई-३२.

१२) कार्यासन अधिकारी, पदुम -१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१३) निवड नस्ती.